झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, से.बापट रोड,पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/तां. २/झोपुआ/प्र.क्र. ९८/१६४७ /१३
दिनांक : १३/९/२०१३

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे (प्रस्तुत आदेशात या आधी नियमाचा उल्लेख यापुढे सोयीसाठी उपरोक्त अधिनियम असा करणेत येत आहे.) कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो- २००४/ प्र.क्र. -२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार खालील अनुसुचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे सक्षम प्राधिकारी गवनि विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दि. ०८/१०/१९९२ गलिच्छ वस्ती / झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार सदर घोषित बांधकाम अयोग्य जागेवर असल्यामुळे त्यांचे पुनर्वसन अन्य जागी करणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर झोपडपट्टी व्याप्त जमिनीचे विकसनाचे हक्क विकसकांना प्राप्त असुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी अन्य ठिकाणच्या रहिवासी विभागातील बांधकाम योग्य जमिन विकसक मे. भक्ती एंटरप्रायझेस यांच्या मालकीची आहे.

देशभक्त मामा साहेब देवगिरीकर सहकारी गृहरचना संस्थेचे चेअरमन व सचिव यांनी मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली याचिका क्र. ६३६७/१९९७ स्वत:हून विहीत मुदतीत काढून घेणेबाबत सादर केलेल्या दि. ०१/०७/२०१३ रोजीच्या प्रतिज्ञापत्रानुसार प्रस्तुतचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश प्रसिध्द करणेत येत आहे.

प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे यांनी पुणे, पेठ एरंडवणे, स.नं. ४१/४, ४५, ४६/७, सि.स.नं. ३३३, ३६०, ३३३+३६० शिलाविहार कॉलनी येथील ओपन स्पेसवरील घोषित झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेल्या परिशिष्ट-२ नुसार सदर ठिकाणी एकूण २१८ झोपडया असून त्यापैकी १६७ निवासी, १ बिगर निवासी, १ संयुक्त असे एकूण १६९ झोपडपट्टीधारक पुनर्वसनास पात्र ठरलेले आहेत. या पात्र झोपडीधारकांपैकी १४९ झोपडीधारकांनी (८८.१६%) झोपडपट्टी पुनर्वसन योजना पुणे, वारजे, स.नं. ७८/१ब/१+१ब/१३+१ब/८ येथे राबविणेसाठी संमिती दिलेली आहे.

अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या पुणे, पेठ एरंडवणे, स.नं. ४१/४, ४५, ४६/७, सि.स.नं. ३३३, ३६०, ३३३+३६० शिलाविहार कॉलनी जमिनीवर झोपडपट्टी असल्याने व बांधकाम अयोग्यतेपोटी सदर झोपडपट्टीचे अन्य बांधकाम योग्य ठिकाणी पुनर्वसन करणे आवश्यक असल्याने पुणे, वारजे, स.नं. ७८/१ब/१+१ब/१३+१ब/८ येथील मिळकत ही दोनही क्षेत्रे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची (अ)

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुणे, पेठ एरंडवणे, स.नं. ४१/४, ४५, ४६/७, प्लॉ.क्र. ७५,७६,७७, सि.स.नं. ३३३, ३६०, ३३३+३६०, शिलाविहार कॉलनी | सि.स.नं. ३३३ = २३४८ चौ. मी. | **पुर्व -** रस्ता व सि.स.नं. ३३२ |
| | सि.स.नं. ३६० = ३४७२ चौ. मी. | **पश्चिम -** कोथरुडची शीव व ओढा |
| | सि.स.नं. ३५७ = ८३३.२५ चौ. मी. | **उत्तर -** एरंडवणा, सि.स.नं. ३६१ |
| | एकुण = ६६५३.२५ चौ. मी. | **दक्षिण -** एरंडवणा, स.नं. ४५ अे.जी. ३५ |

## अनुसूची (ब)

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुणे, वारजे, स.नं. ७८/१ब/१+१ब/१३+१ब/८ | ३३०० चौ. मी. | **पुर्व -** स.नं. ७८ पैकी श्री. मांढे व श्री. गव्हाणे यांची मिळकत |
| | | **पश्चिम -** स.नं. ७८ पैकी श्री. मारणे यांची मिळकत |
| | | **उत्तर -** स.नं. ७८ पैकी श्री. शेख यांची मिळकत |
| | | **दक्षिण -** रस्ता |

सदर आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला आहे.

पुणे -

दिनांक -

**(महेश पाठक)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.